पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक- ११
सभावृत्तांत

दि.- ०४/०२/२०१५ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची सभा बुधवार दिनांक ०४/०२/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता इ क्षेत्रीय कार्यालयाचे “संत ज्ञानेश्वर महाराज” सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.सुरेखा शंकर गव्हाणे – सभापती
२ मा.आल्हाट मंदा उत्तम
३ मा.काळजे नितीन प्रताप
४ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५ मा.वाबळे संजय मल्हारराव
६ मा. मडिगेरी वर्षा विलास
७ मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
८ मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
९ मा.सुपे आशा रविंद्र
१० मा.गोफणे अनुराधा देविदास
११ मा.जालिंदर (बाप्पू) शिंदे
१२ मा.श्रध्दा बाजीराव लांडे
१३ मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१४ मा.लोंढे शुभांगी संतोष

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.आशादेवी दुरगूडे- इ क्षेत्रीय अधिकारी, मा.श्री.दांगट- प्रशासन अधिकारी, मा.साळवी-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), श्री.जयंत बरशेट्टी –कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री.प्रविण घोडे-कार्यकारी अभियंता(विद्युत), मा.श्री.शिंदे एच.एस. उपअभियंता स्थापत्य, मा.श्री.व्ही.बी.माने – उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.वाघमारे एस.बी. उपअभियंता स्थापत्य, मा.श्री.व्ही.सी.काळे- कनिष्ट अभियंता -(विदयुत), मा.श्री.सेठीया मनोज उपअभियंता-जन:नि सारण, श्री.इ.बी.पाटील- उप अभियंता, - मा.श्री.सुरेश इप्प्कायल- लेखाधिकारी, मा.श्री.एस.डी.लगस - सहा.आरोग्याधिकारी, मा.श्री.गौड जितसिंग हिरासिंग -मुख्याध्यापक, मा.श्री. शिरोळे एस.डब्ल्यू – प्र.मुख्याध्यापक, मा.जी.एन.खैरे-सह निरीक्षक, श्री.रावते एस.डी.- सुपरवायझर (उद्यान)

----

मा.सभापती - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

---

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**------**

विषय क्रमांक १) नामफलक मिळणेबाबत. मा.मंदाताई आल्हाट, मा.शुभांगीताई लोंढे यांचे पत्र.

विषय क्रमांक २) प्रभाग क्र.३६ लांडेवाडी मधील एम.आय.डी.सी.ओपन स्पेस क्र.३८ (शांतीनगर पाण्याची टाकी) मधील उर्वरीत जागेत भाजी मंडई विकसीत करणेबाबत. मा.शुभांगीताई लोंढे, मा.श्रध्दा लांडे यांचे पत्र.

विषय क्रमांक ३) प्रभाग क्र.३३ गवळीनगर मधील कै. सखुबाई गबाजी गवळी उद्यानाशेजारी जागेत म.न.पा.मार्फत बांधण्यात आलेले ध्यानकेंद्र व महिला व्यायामशाळा इमारत सामाजिक संस्थेस भाडेतत्वावर चालविण्यास देण्याबाबत. मा.शुभांगीताई लोंढे, मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

विषय क्रमांक ४) प्रभाग क्र.३४ मधील ठिकठिकाणी नांवे देणेबाबत. मा.सुरेखाताई शंकर गव्हाणे यांचे पत्र.

---------

दिनांक ०७/०१/२०१५ रोजीची तहकूब सभा, दिनांक १७/०१/२०१५ दुपारी २.४५ (कार्यपत्रिका क्र.१०) झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

--------

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली-

-----

**सुचक-** मा. श्रध्दा लांडे **अनुमोदक-** मा.मंदाताई आल्हाट

कै.नागकुमार कुणचगी- मुख्य आरोग्य वैद्यकिय अधिकारी, कै.आर.के.लक्ष्मण – जेष्ठ व्यंग चित्रकार, कै.आनंदाराव कल्याणराव शितोळे- सामाजिक कार्यकर्ते इंद्रायणीनगर, कै.मथुराबाई लिंबाजी तांभोरे – सामाजिक कार्यकर्ते इंद्रायणीनगर, कै.रामभाऊ घारे – सामाजिक कार्यकर्ते, कै.प्रसन्नदेवी रामकुमार बंसल, कै.भानुदास गव्हाणे, कै.सोपानकाका लोंढे – जेष्ठ नागरीक, कै.रावण यशवंत लांडगे, कै.प्रकाश दामू लांडगे यांचे निधन झालेने त्यांना इ प्रभाग समितीच्या वतीने भावपुर्वक श्रध्दांजली करीता सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

------

ठराव क्रमांक- २६ विषय क्रमांक- १
दिनांक- ०४/०२/२०१५
सूचक- अनुमोदक-
संदर्भ- क्र.

पिंपरी चिंचवड महानगरपलिकेच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र. ६,७ व २९ ते ३६ असे एकूण १० प्रभागाचा समावेश आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ९ सप्टेंबर २०१३च्या आदेशानुसार राज्याच्या नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात् राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करणेच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणे संबंधी आदेश दिलेले आहेत.त्याप्रमाणे केंद्रशासन राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही/उपाययोजना करणे संदर्भात महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.राकेधो/२०१३/पक्र.३९/नवि/ ३४२९/ १०/२०१३ अन्वये कळविले आहे. मा.कार्यकारी अभियंता स्थापत्य इ क्षेत्रीय कार्यालय यांनी उपरोक्त प्रभागामध्ये हॉकर्स झोन निश्चित केले आहे. मा.सहा.आयुक्त, भूमि आणि जिंदगी विभाग यांचेकडील जा.क्र. भुजि/१/कावि/ २९३/ २०१४ दिनांक १७/११/२०१४ अन्वये झोन निश्चिती संदर्भात मा.प्रभाग समितीची मान्यता घेणेबाबत कळविले आहे. प्रभाग क्र.३५, भोसरी गावठाण नियोजित हॉकर्स क्षेत्र नि श्चीती बाबत मा.नगरसदस्य यांचे आक्षेप असून सदरचे प्रभाग क्र. ३५ बाबत हरकत असलेने सदर क्षेत्रबाबत शहर फेरीवाला समितीत निर्णय घेणे. इतर प्रभागातील इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रस्तावित हॉकर्स झोन निश्चितीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

## सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आलेले विषय दाखल करुन घेण्यात आले.

-----

ठराव क्रमांक- २७ विषय क्रमांक- १

दिनांक- ०४/०२/२०१५

सूचक- मा.मंदाताई उत्तम आल्हाट अनुमोदक- मा.शुभांगीताई लोंढे

संदर्भ- मा.मंदाताई उत्तम आल्हाट, मा. . यांचे पत्र.

मोशी प्रभाग क्र. ६ येथे काही ठिकाणी नामफलक लावणे गरजेचे आहे. त्यामुळे रहिवाशांना सोयीस्कर ठरते. फलकांची नांवे पुढीलप्रमाणे – साई कॉलनी, राजे संभाजी कॉलनी, ज्ञानराज कॉलनी, अष्टविनायक कॉलनी, कुदळे वस्ती, जगताप कॉलनी लक्ष्मीनगर द (पानंद रस्त्यालगत) यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक- २८ विषय क्रमांक- २

दिनांक- ०४/०२/२०१५

सूचक- मा. मा.शुभांगीताई लोंढे अनुमोदक- मा.श्रध्दा लांडे

संदर्भ- मा. मा.शुभांगीताई लोंढे मा.श्रध्दा लांडे यांचे पत्र.

प्रभाग क्र.३६ लांडेवाडीमधील एम.आय.डी.सी.ओपन स्पेस क्र.३८ क्षेत्र १२८ आर म.न.पा.च्या ताब्यात आहे. त्यापैकी १० आर मध्ये पाण्याची टाकी विकसीत करणेत आली आहे. शांतीनगर, आनंदनगर, लोंढेनगर, गुळवेवस्ती, भगतवस्ती परिसरातील नागरीकांना दैनंदिन खरेदी करीता भाजीमंडईसाठी साधारण ३ ते ४ कि.मी.भोसरी उड्डाणपुला खालील ठिकाणी जावे लागते. म.न.पा.मार्फत प्रभाग क्र.३६ लांडेवाडी मधील एम.आय.डी.सी. ओपन स्पेस क्र.३८ क्षेत्र १२८ आर मधील उर्वरीत जागेत भाजी मंडई विकसीत केल्यास शांतीनगर, आनंदनगर, लोंढेनगर, गुळवेवस्ती, भगतवस्ती परिसरातील नागरीकांची सोय होणार आहे. सबब प्रभाग ३६ लांडेवाडी मधील एम.आय.डी.सी.ओपन स्पेस क्र.३८ (शांतीनगर पाण्याची टाकी) मधील उर्वरीत जागेत भाजी मंडई विकसीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- २९ विषय क्रमांक- ३

दिनांक- ०४/०२/२०१५

सूचक- मा.अनुराधा गोफणे अनुमोदक- मा.शुभांगी लोंढे

संदर्भ- मा.अनुराधा गोफणे, मा.जालिंदर शिंदे यांचे पत्र.

प्रभाग क्र.३३ गवळीनगर मधील कै. सखुबाई गबाजी गवळी उद्यानाशेजारी जागेत म.न.पा.मार्फत बांधण्यात आलेले ध्यानकेंद्र व महिला व्यायामशाळा इमारत बांधण्यात आली आहे. सदर ठिकाणी शिपाई व्यवस्था नसल्याने, वारंवार होणा-या दैनंदीन कार्यक्रमातून निर्माण होणारा कचरा, स्वच्छता करणे, नागरीकांचे गैरसोय होणारे प्रश्न उद्भवत आहेत. सदर परिसराची योग्य पध्दतीने व्यवस्था होणाच्या दृष्टीने

सदर इमारत सामाजिक संस्थेस भाडेतत्वावर दिल्यास स्वच्छता राहून इमारतींची देखभाल होणार आहे. प्रभाग क्र.३३ गवळीनगर मधील कै.सखुबाई गबाजी गवळी उद्यानाशेजारी जागेत म.न.पा. मार्फत बांधण्यात आलेले ध्यानकेंद्र व महिला व्यायामशाळा इमारत सामाजिक संस्थेस भाडेतत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक- ३० विषय क्रमांक- ४

दिनांक- ०४/०२/२०१५

सूचक- मा.सुरेखाताई शंकर गव्हाणे अनुमोदक-

संदर्भ- मा. सुरेखाताई शंकर गव्हाणे यांचे पत्र.

प्रभाग क्र.३४ मधील ठिकठिकाणी नांवे देणेबाबत- पाटी नामकरण - कै.भगवान गव्हाणे चौक, जे.पी.नगर गल्ली नं.१, जे.पी.नगर गल्ली नं.२, जे.पी.नगर दत्तमंदीराकडे, उदय चौक, जयमहाराष्ट्र चौक, गव्हाणेवस्ती शनिमंदीराकडे, समता चौक, शिवशक्ती चौक, रामनगरी वसाहत, आदिनाथ नगर, प्रभुरामचंद्र सभागृहाकडे मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
सुरेखा शंकर गव्हाणे
सभापती
इ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/ ०४/कावि/३२/२०१५
दिनांक- १६/०२/२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
**इ क्षेत्रीय कार्यालय**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.